MHGA070005192020

| | |
|---|---|
| दाखल दिनांकः | २८.०७.२०२० |
| नोंदणी दिनांकः | २८.०७.२०२० |
| निकाल दिनांकः | २८.०४.२०२६ |
| कालावधीः | ०५ ०९ ०० |
| | व. म. दि. |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी –** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,**<br>**पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **१४१/२०२०**, अहेरी पोलीस ठाणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | २८.०४.२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **नियमीत फौजदारी खटला क्रमांक ६०/२०२०** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत (फिर्यादी– चिन्नु नारू आलाम) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. आर.एस. उंदिरवाडे,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **जाकेश लालु आलाम,**<br>वय ३० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>राहणार – मोसम, तालुका अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. गलबले**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०३.०५.२०२० |
| पहिल्या खबरीची तारीख | ०३.०५.२०२० |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २८.०७.२०२० |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १२.०३.२०२६ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २८.०४.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जाकेश लालु आलाम | -- | २८.०७.२०२० | भारतीय दंड विधान १८६० च्या कलम ३२४ अन्वये | **निर्दोष** | - | - |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | चिन्नु नारू आलाम (**निशाणी २५**) | फिर्यादी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| ४. | निशाणी **पी–२६**/स.सा.क्र.०१ | तोंडी रिपोर्ट वरील अंगठयाला |
| ५. | निशाणी **पी–२७**/स.सा.क्र.०१ | छापिल नमुन्यातील खबर वरील अंगठयाला |

**ड. <u>महत्त्वाच्या वस्तु</u>:**

| **अ.क्र.** | **महत्त्वाची वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | १४१/२०२० | एक काळया रंगाची लोखंडी सळाख |

## <u>न्यायनिर्णय</u>

(निकाल दिनांक : २८ एप्रिल, २०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ प्रमाणे खटला चालवण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, फिर्यादी नामे चिन्नु नारू आलाम, यांनी दि.०३.०५.२०२० यांनी बयान दिले की, दि.०३.०५.२०२० रोजी फिर्यादी रात्री ०८.०० वाजता ते हजर असतांना त्यांचा पुतन्या आरोपी जाकेश त्याच्या घरी गेला व म्हणाला की, तु दोन एकर जमीन नेहमी पडीत ठेवता त्या जमीनीत तु काही लावत नाहीत ती

जमीन यावर्षी ते करतो तु दुस–याला जमीन देवू नकोस असे म्हणला तेव्हा फिर्यादी म्हणाला की, मी कुणालाही जमीन देवू शकतो असे बोलले असता आरोपीने त्याच्यासोबत झगडा भांडण करून शिवीगाळ केली व लोखंडी सळाखीने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटावर व पाठीवर सलाखीने मारून दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी देवून निघून गेला.

३. पोलीस ठाणे अंमलदाराने सदर तक्रारीवरुन अपराध क्र.१४१/२०२० उपरोक्त कलमान्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास पो.हवा. राजकुमार सहारे यांच्याकडे सोपवण्यात आला. त्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. घटना स्थळावर जावुन पंचनामा पंचासमक्ष तयार केला. त्यानंतर त्यांनी फिर्यादीचे बयान नोंदविले तसेच ईतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले. पुरावा गोळा करुन त्यांनी सविस्तर अहवाल तयार करुन तपासाअंती आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी, दि.१२.०३.२०२६ रोजी आरोपीविरुध्द नि.क्र.२३ वर दोष निश्चित केले. त्यातील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगितला. त्यांनी गुन्हा कबूल न करता न्याय चौकशी सामोरे जाणे पसंत केले. त्याच्याविरुध्द पुरावा नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदवण्यात आले नाही.

५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, प्रथम, दिनांक ०३.०५.२०२० रोजी, सुमारे २०:०० वाजता, मौजा मोसम, तालुका अहेरी, जिल्हा गडचिरोली येथे, आरोपीने आरोपीने फिर्यादी चिन्नु नारू आलाम याला लोखंडी सळाखीने स्वेच्छेने दुखापत केली, जे एक प्राणघातक हत्यार आहे आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र हा गुन्हा केला आहे. | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकामी एक साक्षीदाराची साक्ष नोंदवली. तपशील खालीलप्रमाणे:

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदारांचे नावे | पुराव्याचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | चिन्नु नारू आलाम | फिर्यादी | २५ |

**मुद्दा क्र.१ ते ३ करिताः**

७. सदर मुद्दे एकमेकाशी निगडीत असल्याने ते मी एकत्रीतरित्या निर्धारणासाठी घेतले आहे. ०३.०५.२०२० रोजी आरोपीने आरोपीने फिर्यादी चिन्नु नारू आलाम याला लोखंडी सळाखीने स्वेच्छेने दुखापत केली, जे एक प्राणघातक हत्यार असून अभियोगपक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे.

८. फिर्यादी साक्षीदार सा.क्र.१ **चिन्नु नारू आलाम,** यांचे सरतपासात असे कथन केले की, ते आरोपीला ओळखत असुन आरोपी त्याचा भाउचा मुलगा आहे. घटना चार ते पाच वर्षापुर्वी मोसम येथे सकाळी घडली होती. आरोपी व त्याच्यामध्ये बाचाबाची झाली होती. त्यामुळे तो खाली पडला व त्याला डाव्या हाताच्या मनगटावर व पाठीवर मार लागला होता म्हणुन त्याने रागाच्या भरात आरोपीविरूध्द तोंडी रिपोर्ट दिली. त्यांनी तोंडी रिपोर्ट वरिल अंगठयाला नि.क्र.२६ व प्रथम खबर अहवाल वरिल अंगठयाला नि.क्र.२७ नोंदविले. त्यातील मजकूर मला माहित नाही. सदर साक्षदार अभियोग पक्षास समर्थन करीत नसल्याने फिर्यादीची उलटतपास घेण्यास आली व उलटतपासात त्यांनी नाकबुल केले की, आरोपीने त्याला जमीनीचे वादावरून लोखंडी सलाखीने मारले होते व त्यामुळे त्याला दुखापत झाली होती. त्यांनी असेही मान्य केले की, आरोपीचे न्यायालया बाहेर तडजोड झाली आहे त्यामुळे त्यांना

प्रकरण पुढे चालवायचे नाही. त्याकरिता पुरसीस नि.क्र.२८ दिली.

९.        अभियोगपक्षाला संधी देवुन देखील त्यांनी तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदवली नाही. तसेच ईतर स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष देखील अभियोगपक्ष नोंदवण्यास अपयशी ठरला आहे.

१०.        सहा.सरकारी अभियोक्ता आणि आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच प्रकरण व त्यामध्ये दाखल सर्व दस्ताऐवजांचे अवलोकन केले.

११.        अभिलेखावरील साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फक्त एकच साक्षीदार फिर्यादीला तपासले. फिर्यादीने आरोपीविरूध्द काही सांगितले नाही. तसेच अभियोग पक्षाले भरपुर वेळ दिल्यानंतर हि त्यांनी सदर प्रकरणात तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. सदर प्रकरणात फिर्यादी व आरोपी यांची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाल्याची पुरसिस नि.क्र.२८ दाखल करण्यात आली. येथे हे म्हणणे गरजेचे आहे की, कारण काहीही असो अभिलेखावर पुरावा आणण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे, परंतु ती जबाबदारी अभियोगपक्ष पार पाडण्यात अपयशी ठरला आहे.

१२.        अभिलेखावर आरोपीविरुध्द पुरावा आणण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे, परंतु सदर प्रकरणात फिर्यादीने आरोपींविरूध्द पुराव्यात काही नाही सांगितल्याने आणि वैद्यकीय अधिकारी व तपासी अधिकारी यांची साक्ष न घेतल्यामुळे अभियोगपक्ष अभिलेखावर पुरावा आणण्यास असमर्थ ठरले आहे. एकंदरीत वर चर्चा केल्याप्रमाणे सर्व बाबींचा विचार करता आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला असे माझे मत आहे. परिणामतः पुराव्याअभावी, मी मुददा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिताः</u>**

१३.        उपरोक्त चर्चेनुसार मुद्दे क्र.१ चे कारणमिमांसेवरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द केला नसल्याने, आरोपीला सदर खटल्यातुन निर्दोष मुक्त करणेचे निष्कर्षाप्रत मी आलो आहे. सदर प्रकरणात फिर्यादी फितुर झाल्याने माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता**[1] मध्ये दिलेल्या निर्देशाची अनुपालन करण्याची आवश्यकता नाही. म्हणुन, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.चे कलम ३२४ नुसार दंडनिय अपराधातुन निर्दोष ठरवून मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जुनी जामिनपत्र रद्द करुन जामिनदारास मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. जप्त मुददेमाल एक काळया रंगाची लोखंडी सळाख अपील कालावधीनंतर कायदेशिर विल्हेवाट लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.04.28 17:39:57 +0530

दि.२८.०४.२०२६                    (एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी

1 फौजदार अर्ज क्र.३८०/२०१९ मध्ये दि.१६.०७.२०२० चे आदेशाप्रमाणे